माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वयेदाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१३८६

**अपिलार्थी श्री. आनंद श्रीधर पारकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
मुंबई उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
मुंबई उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १६.०२.२०२४ | २२.०२.२०२४ | ०६.०३.२०२४ | २७.०३.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०५.२०२४ रोजीच्या अर्जान्वये चुकीचा आशय काढून प्रथम अपील रद्द केले असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २२.०२.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २७.०३.२०२४ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १६.०२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी दि. ०८.१२.२०२३ रोजी केलेली तक्रारीवर करण्यात आलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०२.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, *(1) The information sought by you is vague and presumptive in nature, which can not be rermed as an 'Information' as per Section 2(f) of the Right to Information Act, 2005. (2) Even otherwise, the concerned department has informed as under:-"The concerned department has received your two applications dated 08.12.2023 from the office of the Hon'ble the Chief Justice on 11.12.2023. (3) The same were registered in P. G. Cell under Inward Nos.6716 & 6714 on 14.12.2023 respectively. (4) The above applications were filed/closed in concerned department on the ground that the same were properly addressed to the concerned appropriate authorities, who are competent to take appropriate action as per provisions of the law. Hence, no action warranted at their end." (5) As regards the supply of the copies of action taken is concerned, the same cannot be provided as the same is exempted from disclosure under Section 8(1)(g) of the Right to Information Act, 2005. (6) Apart from above, rest of the information can not be provided as the same is held by the concerned department in fiduciary relationship. Hence, as per provision of Section 8(1)(e) of the Right to Information Act, 2005, the information sought by you can not be provided.*

..२/-

अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि ०६.०३.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिलेले उत्तर योग्य आहे असे नमुद करुन दि. २७.०३.२०२४ रोजी प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी (व्ही.सी. माध्यमाव्दारे) उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मा. उच्च न्यायालय कार्यालयाने संबंधीत विभागाकडून माहिती प्राप्त करुन त्यांना दिली पाहिजे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांची तक्रार दि. ०८.१२.२०२३ उपनिबंधक, सहकारी संस्था, पूर्व उपनगरे, मुंबई यांचेविषयी होती व अपिलार्थींना विहित कालावधीत उत्तर कळविण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असेही सादर केले की, सदर तक्रार बंद करण्यात आली आहे. कारण अशा प्रकारची तक्रारीवर निर्णय देण्याचे प्राधिकरण वेगळे/ भिन्न आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उत्तर दिलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

20-10-2025

**मुंबई**
**दिनांक : २०.१०.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**